जनसंपर्क कक्ष
18 OCT 2021
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये, अधिविभागातील अंतिम वर्षाचे वर्ग बुधवारपासून

## तयारी अंतिम टप्प्यात; विद्यापीठ कार्यक्षेत्रात ६० हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दीड वर्षानंतर शाळानंतर आता शिवाजी विद्यापीठातील संलग्न महाविद्यालये, अधिविभागांचे २० ऑक्टोबरपासून शैक्षणिक वर्ष प्रारंभ होणार आहे. पहिल्या टप्प्यात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी असलेल्या ठिकाणचे विद्यापीठातील अधिविभाग, संलग्न महाविद्यालयांतील अंतिम वर्ष प्रथम सत्राचे नियमित वर्ग सुरू होणार आहेत.

महाविद्यालये बुधवारपासून सुरू होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाकडून अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये सुरू करण्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात २७६ महाविद्यालये असून, अंतिम वर्षाचे सुमारे ६० हजारांहून




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहाची स्वच्छता करताना कर्मचारी.**

विद्यार्थी आहेत. महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग, विद्यार्थी, विद्यार्थिनी वसतिगृहाची स्वच्छता, सॅनिटायझेशन सुरू आहे. कमी क्षमतेवर वसतिगृह सुरू केली जाणार असून, केवळ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश दिला जाणार आहे.

महाविद्यालये, अधिविभागातील अंतिम वर्षाचे वर्ग सुरू करताना राज्य शासन, जिल्हा प्रशासन आणि विद्यापीठ प्रशासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याबाबत नुकतेच कुलसचिवांनी परिपत्रक काढले आहे. स्थानिक प्रशासनांनी चर्चा करून विद्यार्थ्यांचे शंभर टक्के लसीकरण पूर्ण करून घ्यावे. ज्या भागात कोरोनाचा संसर्ग कमी आहे, अशा ठिकाणची महाविद्यालये, अधिविभाग सुरू करण्याची जिल्हा प्रशासनाकडून परवानगी घेण्यात यावी, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

पुढारी

# एम. फिल, पीएच. डी. प्रवेश परीक्षा २६ पासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षासाठी एम. फिल, पीएच. डी. प्रवेश परीक्षेस दि. २६ ऑक्टोबरपासून प्रारंभ होणार आहे. शहाजी छत्रपती महाविद्यालय (कोल्हापूर), श्रीमत मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय (सांगली) व सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स महाविद्यालयात या परीक्षा होणार आहेत. दि. २८ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा चालणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

लोकमत

# विद्यापीठ, महाविद्यालयेही बुधवारपासून सुरू होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शासनादेश व कोरोना प्रतिबंधक निर्देशांचे पालन करीत बुधवार (दि. २०)पासून शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग, संलग्न महाविद्यालये पूर्ण क्षमतेने सुरू होत आहेत. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी परिपत्रक काढून अंतिम वर्षाचे सर्व वर्ग सुरू होत असल्याचे कळविले आहे.

कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर गेल्या सहा-सात महिन्यांपासून शिवाजी विद्यापीठातील अधिविभागासह संलग्न महाविद्यालयातील अध्यापन बंदच आहे. ऑनलाइन पद्धतीनेच सर्व शिक्षण सुरू आहे; पण आता कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात आल्याने उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे कार्यासन अधिकारी प्रवीणकुमार पवार यांनी पत्र काढून महाविद्यालये स्थानिक परिस्थिती पाहून सुरू करावीत, असे आदेश दिले होते. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने अंतिम वर्षातील सर्व वर्ग सुरू करण्याची तयारी केली आहे. कोरोनाच्या बाबतीत सर्व प्रकारचे नियम पालन होईल याची दक्षता घ्या, असेही सांगण्यात आले आहे.

आता प्रवेशासाठी शंभर टक्के लसीकरणाची अट घालण्यात आली आहे; पण १८ वर्षांवरील लसीकरण पूर्ण क्षमतेने महिनाभरापूर्वी झाले आहे. पहिल्या व दुसऱ्या डोसमधील ८४ दिवसांचे अंतर पाहता बहुतांश विद्यार्थ्यांचा पहिला डोस झाला आहे. अजून दुसरा डोस घेण्याची तारीखच आलेली नाही, मग दोन डोस नाही म्हणून महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाही का, यावरून विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम असल्याचे चित्र आहे.

सकाळ

# फॅकल्टी चेंज परीक्षा होणार रद्द

## दूर शिक्षणच्या विद्यार्थ्यांना अन्य पदवी घेता येणार



कोल्हापूर, ता. १७ : दूर शिक्षण अभ्यासक्रमाअंतर्गत शिक्षण घेताना विषय बदलण्यासाठी, द्यावी लागणारी फॅकल्टी चेंज परीक्षा रद्द करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे.

लवकरच याबाबतचे परिपत्रक काढले जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. यामुळे आता दूर शिक्षण अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना अन्य विषयातही पदवी घेता येणार आहे. ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे. ज्यांना नोकरी, व्यवसाय किंवा घरकाम करत शिक्षण पूर्ण करायचे आहे अशा व्यक्तींना शिक्षणाची दारे उघडण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण केंद्र सुरू केले. त्यामुळे बहिस्थ पद्धतीने शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढली. काही जणांना पदव्युत्तर शिक्षण हे दुसऱ्या विषयात घ्यायचे असते. त्यांचा पदवीचा विषय वेगळा असतो. अशावेळी त्यांना फॅकल्टी चेंजची परीक्षा द्यावी लागत असे. ही परीक्षा देण्यासाठी प्रवेश परीक्षा घेणे, त्यासाठी प्रश्नपत्रिका बनवणे, उत्तरपत्रिका तपासणे ही सर्वच प्रक्रिया राबवावी लागते.

विद्यार्थ्यांनाही परीक्षा शुल्क भरावे लागते. अन्य विद्यापीठात ही परीक्षा घेतली जात नाही. या सर्वांचा विचार करून शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने फॅकल्टी चेंज ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच याबाबतचे परिपत्रक काढून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल.

18 OCT 2021
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांच्या स्वागताची तयारी

## बुधवार २० ऑक्टोंबरपासून ५० टक्के क्षमतेने होणार महाविद्यालये सुरु

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असताना पावणेदोन वर्षापासून बंद असलेल्या महाविद्यालय व अधिविभागांची दारे २० ऑक्टोबरपासून विद्यार्थ्यांसाठी खुली होणार आहेत. यापुर्वीचे अकरावीचे वर्ग सुरू असल्याने महाविद्यालयांची स्वच्छता व सॅनिटायझेशन अगोदरच झाले आहे. शासन व विद्यापीठ सूचनांचे पालन करीत महाविद्यालये विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यास सज्ज आहेत. परंतू कोरोनाचे दोन डोस घेतलेल्यांनाच महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे ५० टक्के उपस्थितीत आपला नंबर लागावा यासाठी विद्यार्थीही लस घेण्यास प्राधान्य देत आहेत.


कोरोनानंतर पावणेदोन वर्षांनी महाविद्यालये सुरू होणार असल्याने ऑनलाईन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये चैतन्याचे वातावरण आहे. बारावी उत्तीर्ण होवूनही अद्याप सिनिअर कॉलेजचा अनुभव घेतला नाही, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जाण्याविषयी मोठी उत्सुकता आहे. गुणवत्ता यादीत नेहमीच अव्वल असणारे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण, ऑनलाईन परीक्षांना अक्षरशः कंटाळले आहेत. दोन डोस घेतलेल्याच विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश दिला जाणार आहे. काही विद्यार्थ्यांचे कोरोना लसीकरण पूर्ण झाले असेल तरी बहुतांश विद्यार्थ्यांनी अद्याप लस घेतलीली नाही. अशी १८ वर्षावरील सर्व विद्यार्थी लसीकरण पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहेत. कारण प्रत्यक्ष अध्यापनाचा आनंदच वेगळा असतो. ज्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालये व अधिविभागांनी ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. उच्च व तंत्रशिक्षण संचालनाबरोबर चर्चा करून टप्प्याटप्प्याने वसतिगृह सुरू करावी, असे आदेश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत. त्यामुळे वसतिगृह कधी सुरू होणार, याकडे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. दसरीकडे महाविद्यालयांनी वर्ग सुरू करण्याची जय्यत तयारी केली आहे.

**विद्यापीठ अधिविभागातील विद्यार्थ्यांच्या राहण्याचा प्रश्न**

शिवाजी विद्यापीठ अधिविभागात जवळपास ६० टक्के विद्यार्थी ग्रामीण भागासह इतर जिल्हा व राज्यातील असतात. त्यामुळे प्रत्यक्ष अधिविभागात येवून शिक्षण घ्यायचे म्हंटले की पहिल्यांदा राहण्याची सोय होणे आवश्यक आहे. त्यामुळे अधिविभागाबरोबर वसतिगृह सुरू करवीत, अशा भावना विद्यार्थ्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

तरूण भारत

# पदवी, पदव्युत्तर अंतिम वर्षाचे वर्ग बुधवारपासून सुरू



- विद्यापीठ प्रशासनच्या महाविद्यालयांना सूचना
- ५० टक्के क्षमतेसह शासन नियमांचे पालन करण्याचे आदेश
- दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, अंतर्गत अधिविभाग व महाविद्यालयांनी अंतिम वर्षातील प्रथम सत्राचे वर्ग २० ऑक्टोंबरपासून सुरू करावेत. हे वर्ग सुरू करताना शिवाजी विद्यापीठ, जिल्हा प्रशासन, राज्य शासन, केंद्र शासनाकडून येणाऱ्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. अशा आशयाचे परिपत्रक शिवाजी विद्यापीठाकडून महाविद्यालयांना पाठवले आहे.

शासन आदेशानुसार २० ऑक्टोंबरपासून महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली आहे. कोरोनाचे दोन डोस पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात किंवा विद्यापीठात प्रवेश देण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. त्याचबरोबर ५० टक्के क्षमतेची अटही असणार आहे. त्यामुळे विद्यापीठाने महाविद्यालय व विद्यापीठ अधिविभागातील अंतिम वर्षाचे वर्ग सुरुवातीला सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याबरोबर प्रॅक्टीकलही पूर्ण करून घेतले जाणार आहे. यामध्ये बी. ए., बी. एस्सी., बी. कॉम., एम. ए., एम. एस्सी., एम. कॉम., इंजिनिअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, एम. बी. ए., अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. हे वर्ग सुरू करण्यासंदर्भात विद्यापीठ प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार करून परवानगीही मागितली आहे. त्यामुळे विद्यापीठाने पदवी व पदव्युत्तरचे वर्ग सुरू करण्याची पूर्ण तयारी केली आहे. तसेच अधिविभाग व महाविद्यालयांना कोरोनाच्या नियांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

तरूण भारत

# ‘मोडीसह अन्य लिपींच्या संवर्धनाची आहे गरज’

प्रतिनिधी

कोल्हापूर

मोडीसह इतर लिपीही लोप पावत आहेत. अर्धमागधी, मोडी, फारशी, पांडू व ब्राम्ही यासह ६४ लिपींचे अस्तित्व नाहीसे झाले आहे. भारताचा इतिहास जाणून घेण्यासाठी या लिपींचे संवर्धन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मोडी लिपी तज्ज्ञ वसंत सिंघन यांनी केले.

विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभाग, व इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लिपींचे संवर्धन जाणीव जागृती या विषयावर ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

ते म्हणाले, लिपींचा अभ्यास करताना वाचन, लेखन समजून घेणे व त्याचे भाषांतर त्या त्या कालानुरूप करून घेणे अतिशय महत्वाचे आहे. यासाठी अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. या अभ्यासक्रमासाठी तज्ज्ञांची गरज आहे, असे सांगितले.

इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील म्हणाले, लोप पावणाऱ्या लिपी वाचणारे, जाणणारे व देवनागरीत भाषांतर करणारे तज्ज्ञ निर्माण केले पाहिजेत.

प्रभारी संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सुमन बुवा यांनी प्रास्ताविक केले. यशोधन बोकील यांनी स्वागत केले. रवींद्र खैरे यांनी आभार मानले. अरविंद पालके यांनी सूत्रसंचालन केले.